# प्रेस नोट

**पोलीस आयुक्त,अमरावती शहर आस्थापनेवरील पोलीस शिपाई भरती 2021 व पोलीस शिपाई चालक भरती 2021 बाबत उमेदवारांसाठी महत्वाची सुचना**

---000---

पोलीस आयुक्त,अमरावती शहर आस्थापनेवर पोलीस शिपाई पदे -20 व पोलीस शिपाई चालक पदे 21 करिता दि.2.1.2023 रोजी सकाळी 6.00 वाजता पासुन पोलीस भरती प्रक्रीया पोलीस मुख्यालय,अमरावती शहर येथील कवायत मैदानावर राबविण्यात येणार आहे. चालक पोलीस शिपाई पदाकरीता 859 उमेदवारांनी आवेदन अर्ज केले असुन पोलीस शिपाई पदाकरीता 1390 उमेदवारांनी आवेदन अर्ज केले आहेत. उमेदवारांना प्रवेश पत्र ऑनलाईन पध्दतीने प्राप्त होणार आहे. पोलीस भरती प्रक्रीयेमध्ये डमी उमेदवार आढळुन आल्यास त्या उमेदवारावर कायदेशिर कारवाई करण्यात येईल. पोलीस भरतीची संपुर्ण प्रक्रीया उमेदवाराचे गुणवत्तेनुसार नि:पक्षपातीपणे व पारदर्शकपणे शासन नियमानुसार राबविण्यात येणार आहे. त्यामध्ये कोणत्याही प्रकारे वशिलेबाजी,शिफारस, नियमबाहयता व गैरप्रकाराला मुळीच वाव राहणार नाही. यादृष्टीने अत्यंत काटेकोरपणे नियमानुसार प्रक्रीया होणार आहे. त्यामुळे या भरतीच्या संबंधाने भरती करून देतो, नोकरी लावून देतो, माझी खूप ओळख आहे असे सांगून कोणी लाचखोरी करीत असेल अथवा पैशाची मागणी करीत असेल तर अशा प्रलोभन देणा-या व्यक्तीपासून सर्व संबंधीत उमेदवारांनी सावध रहावे, कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये, असे आढळुन आल्यास त्याबाबतची तक्रार पोलीस आयुक्त,कार्यालय अमरावती शहर येथील दुरध्वनी क्र. 0721-2551001, पोलीस नियंत्रण कक्ष,अमरावती शहर येथील भ्रमणध्वणी क्रमांक 9923078696, 9923078646 व पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती यांचे दुरध्वनी क्र. 0721-2553055 वर करण्यात यावी.

तसेच प्रलोभन देणारे व्यक्ती अथवा एजंट निदर्शनास आल्यास त्याची माहिती जरुर दयावी. माहिती देणा-याचे नाव गुप्त ठेवण्यात येईल. उमेदवाराने त्यांना प्राप्त होणा-या प्रवेशपत्रामध्ये दिलेल्या तारखेला व वेळेवर न चुकता उपस्थित राहावे. दिलेल्या तारखेला उमेदवार अनुपस्थित राहील्यास किंवा विलंबाने हजर राहील्यास त्यांना पुन्हा संधी देण्यात येणार नाही. पोलीस भरतीकरीता येतांना सर्व मुळ कागदपत्रे,4 पासपोर्ट साईज फोटो सोबत आणावे. उमेदवारास भरतीच्या परिसरामध्ये भ्रमणध्वणी सोबत बाळगता येणार नाही.भ्रमणध्वणी वापरतांना उमेदवार आढळल्यास त्या उमेदवारावर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी. पोलीस भरती प्रक्रीयेच्यावेळी उमेदवारास कोणतीही शारिरीक इजा/नुकसान झाल्यास त्यास उमेदवार स्वत: जबाबदार राहील. उमेदवारांनी त्यांचे क्षमतेप्रमाणे व स्वत:ची काळजी घेवुन चाचणी पार पाडावी. तसेच उमेदवार चाचणीच्या वेळी मादक द्रव्य प्राशन केल्याचे आढळल्यास त्या उमेदवाराला अपात्र ठरवुन कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

**( नवीनचंद्र रेड्डी )**
पोलीस आयुक्त,अमरावती शहर

प्रति,

संपादक ------------------------------------ अमरावती.